|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

**विद्यार्थी विकास विभाग**

# निविदा सूचना

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे ' स्वातंत्र्यदिन अमृत महोत्सवी ' वर्षानिमीत्त **जालीयनवाला बाग** या विषयावर आधारीत नाटयप्रयोग जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्हयातील विविध महाविद्यालयांमध्ये सादर करण्यासाठी नाटयप्रयोग सादरकर्त्यांकडून निविदा मागविण्यात येत आहेत.

त्यासंबंधीची कोरी निविदा संपूर्ण माहिती, अटी व शर्तीसह या सोबत उपलब्ध करुन देण्यात आली आहे. नाटयप्रयोग सादरकर्त्यानी सदरची निविदा विद्यापीठ संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन भरलेली निविदा दि. २२.०९.२०२२ पर्यत किंवा तत्पुर्वी कार्यालयीन वेळेत, कामकाजाच्या दिवशी संचालक, विद्यार्थी विकास, ए.पी.जे.अब्दुल कलाम भवन कबचौउमवि, जळगाव यांच्या कार्यालयात जमा कराव्यात.

सदर निविदा सादर करण्यासाठी शुध्दीपत्रक अथवा मुदतवाढ दिल्यास त्यासंबंधीची सूचना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

स्वाक्षरीत/-

(प्रा. सुनील कुलकर्णी)

**संचालक, विद्यार्थी विकास** (अतिरिक्त कार्यभार).

जा.क्र.कबचौउमवि/१४/विवि/जालीयनवाला बाग/२५८ /२०२२

दि. ०७.०९.२०२२

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

---

## जालीयनवाला बाग नाट्यप्रयोग नियमावली

स्वातंत्र्यवीरांच्या बलिदानाने भारत देशाला स्वातंत्र्य मिळाले असून त्यास ७५ वर्ष पूर्ण झाले आहे. देशाच्या स्वातंत्र्यदिनाचे हे अमृत महोत्सवी वर्ष असून आपल्या विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीचे चैतन्य निर्माण व्हावे तसेच स्वातंत्र्यदिनाचा इतिहास अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचावा यादृष्टीने विद्यापीठाव्दारे विविध देशभक्तीपर कार्यक्रमांचे संपूर्ण वर्षभर आयोजन करण्यात येत आहे.

त्याच्याच एक भाग म्हणून जालीयनवाला बाग नाटयप्रयोग विद्यापीठ संलग्नीत महाविद्यालयात (जळगाव, धुळे व नंदुरबार या जिल्हयांमध्ये) एकूण १७ ठिकाणी आयोजीत करावयाचा आहे. या उपक्रमासाठी विविध सांस्कृतिक संस्था अथवा नाटय मंडळ यांचेकडून निविदा मागविण्यात येत आहेत. निविदेच्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे -

१) निविदा भरणा-या संस्थेला सांस्कृतिक कार्यक्रमाचा अनुभव असणे आवश्यक आहे व त्यासाठीचे पुरावे निविदे सोबत जोडावेत.

२) सदर नाटयप्रयोग जालीयनवाला बाग या घटनेशी आधारीत व प्रबोधनात्मक माहिती देणारा असावा.

३) सदरचा नाटयप्रयोग हा किमान दिड तासांचा असावा. (पडदा उठल्यापासून शेवटच्या पडदा पडे पर्यत)

४) या नाटयप्रयोगाची संहिता निविदेसोबत सादर करणे आवश्यक आहे. निविदा मान्य झाल्यास सादर केलेल्या संहितेमध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.

५) सदर नाटयप्रयोग हा राजकीय तसेच धर्म, जात, भाषा, प्रांत, लिंग आदी विषयी कोणत्याही प्रकारची टिका टिपण्णी करणारा नसावा. या संदर्भाचे वाद निर्माण झाल्यास नाट्यप्रयोग सादरकर्ते यांची जबाबदारी राहील.

६) निविदा धारकाने या नाटयप्रयोगाचा एकत्रित खर्च निविदेत नमूद करावा (मानधन, निवास, प्रवास खर्च,वेशभूषा, साऊंड सिस्टीम,चहा-नास्ता, भोजन यासह)

७) सदर नाटयप्रयोगासाठी कलावंताची यादी किमान दोन नाट्यप्रयोगाच्या अनुभवासह, वाद्यवृंद व अनुषंगीक बाबी प्रस्तावात देणे आवश्यक आहे.

८) या नाटयप्रयोगासाठी लागणारे सर्व साहित्य व आवश्यक असणारे मनुष्यबळ सदर संस्थेने स्वतः आणणे आवश्यक आहे.

९) एका नाट्यप्रयोगासाठीचा प्रस्ताव रु. ३५,०००/- पर्यंतच्या मुद्दा क्र. ६ मध्ये नमूद खर्चाच्या अनुषंगाने मर्यादेत असावा.

१०) हा नाटयप्रयोग सार्वजनिक ठिकाणी करावयाचा असल्यामुळे त्यासाठी कोणतीही तिकीट विक्री करता येणार नाही.

११) निविदा खर्च म्हणून निविदे सोबत रु. ५००/- (अक्षरी रुपये पाचशे मात्र) चा धनाकर्ष (डी.डी.) नापरतावा म्हणून द्यावा लागेल व सुरक्षा अमानत म्हणून बिनव्याजी रु. ५,०००/- (अक्षरी रुपये पाच हजार मात्र) चा धनाकर्ष (डी.डी.) द्यावा लागेल. दोन्ही धनाकर्ष (डी.डी.) वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगाव यांच्या नावे असावेत.

१२) निविदा मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार विद्यापीठाकडे राहतील.

१३) यासंदर्भात वाद निर्माण झाल्यास अंतीम निर्णय मा. कुलगुरु महोदयांचा मान्य करावा लागेल.

१४) नाट्यप्रयोगा संदर्भात न्यायालयीन क्षेत्र केवळ जळगाव असेल.

१५) निविदाधारकास विद्यापीठाकडून कुठलाही अग्रीम दिला जाणार नाही, ज्या महाविद्यालयात नाट्यप्रयोग असेल तेथे देयका बाबत आवश्यक त्या बाबी पुरविणे बंधनकारक राहील, देयकाची अदायगी महाविद्यालयामार्फत TDS कपात करुन चेकने/ RTGS ने होईल, प्रस्तावा सोबत संस्थेचे पॅनकार्डची प्रत जोडावी.

१६) संपुर्ण भरलेली निविदा दि. २२ .०९.२०२२ पर्यत कार्यालयीन वेळेत कामकाजाच्या दिवशी विद्यापीठाच्या संचालक, विद्यार्थी विकास विभाग, कबचौउमवि, जळगाव यांच्या कार्यालयात जमा करावी.

---

# जालीयनवाला बाग नाट्यप्रयोग

## निविदा अर्ज

१) अर्जदाराचे संपूण नांव : ----------------------------------------------------

२) संस्थेचे नाव : ----------------------------------------------------

३) संस्था नोंदणीकृत आहे/ नाही : ----------------------------------------------------

(असल्यास नोंदणी क्रमांक)

४) पत्रव्यवहाराचा पत्ता : ----------------------------------------------------

५) कायमचा पत्ता : ----------------------------------------------------

६) अर्जदाराचा दूरध्वनी / भ्रमणध्वनी/ ई-मेल : ----------------------------------------------------

७) संस्थेचा सांस्कृतिक कार्यक्रमाच्या अनुभवनाचा तपशिल :--------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

अर्जासोबतची नियमावली मी पूर्णपणे वाचली असून मला ती मान्य आहे. स्वातंत्र्यदिनाचे हे अमृत महोत्सवी वर्ष निमित्त आयोजीत जालीयनवाला बाग नाटयप्रयोग सादर करण्यास मी / आम्ही तयार असून नियमावलीचा भंग होणार नाही याची हमी देतो.

**निविदाधारकाचे पूर्ण नाव व स्वाक्षरी**

ठिकाण :

दिनांक :

# जालीयनवाला बाग नाटयप्रयोग

## दराची निविदा

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे ' स्वातंत्र्यदिन अमृत महोत्सवी ' वर्षानिमीत्त **जालीयनवाला बाग** या विषयावर आधारीत नाटयप्रयोग जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्हयातील विविध महाविद्यालयांमध्ये सादर करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने नाटयप्रयोग घेण्याबाबतचा तपशिल व दर खालील तक्त्यामध्ये नमूद करीत आहोत.

| अ.क्र. | जालीयनवाला बाग नाटय प्रयोगाचा तपशील | एकूण दर |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |

**निविदाधारकाचे पूर्ण नाव व स्वाक्षरी**

ठिकाण :

दिनांक :